**नि.क्र. १८ वरील आदेशाप्रमाणे विना उलट तपासाचा आदेश रद्द झाल्याने शपथेवरती उलट तपास सुरु.**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०२ ची साक्ष**

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.यु.बी.कुळकर्णी यांचे मार्फत.**

०२. हे मला सांगता येणार नाही की, पंचनाम्यामध्ये मी नारिंग्रे येथून आलो होता ही बाब पोलीसांनी नमूद केली होती किंवा नाही. हे म्हणणे खरे आहे की, नारिंग्रे ते आचरा १० ते १२ किलोमिटर अंतर आहे. मी पोलीसांना नारिंग्रे येथून आलो होतो ही बाब सांगितली नव्हती. मी यापूर्वी कुठल्याही पंचनाम्यामध्ये भाग घेतला नव्हता. मला पंचनामा करायचा आहे ही बाब पोलीसांनी सांगितली होती. मला पुरळकर किंवा परुळेकर नावाच्या पोलीसांनी सदरची बाब सांगितली होती. मला त्यांचा बक्कल नंबर सांगता येणार नाही. मला पुरळकर नावाचा पोलीस घटनास्थळावरती भेटला होता. हे मला सांगता येणार नाही की, माझी पुरळकर यांच्याशी किती वाजता भेट झाली होती. मी घटनास्थळी मोटरसायकलने आलो होतो. मी घटनास्थळी पंचनाम्यासाठी आलो होतो. पंचनामा करायचा आहे परुळकर यांनी फोनवर सांगितले होते. मला किती वाजता फोन आला होता हे माझ्या लक्षात नाही. मला परुळकर यांचा फोन आला होता ही बाब दर्शविण्यासाठी मी कॉल रेकॉर्डीग हजर करु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला कुठलाही फोन आला नव्हता व मी घटनास्थळी गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचनाम्याला हजर होतो ही बाब दर्शविण्यासाठी माझ्या शब्दाशिवाय माझ्याकडे पुरावा नाही. मी त्या ठिकाणी हजर होतो ही बाब दर्शविण्यासाठी जखमीचा मेव्हूणा व पोलीस यांचा पुरावा आहे. पोलीसांसोबत हजर असलेल्या इसमाच्या नावाची खात्री करण्यासाठी मी आधारकार्ड पाहिले नव्हते.

०३. पंचनाम्याच्या वेळेस वाहने रस्त्याच्या साईडला कडेला ठेवलेल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, दोन्हीही वाहने रस्त्याच्या बाजूला ठेवले होते. मी वाहनांचे इंजिन नंबर व चेसीस नंबर पाहिले नव्हते. मी वाहनांचे आर.सी.बुक पाहून अपघातातील वाहनांच्या क्रमांकाची

खात्री केली नव्हती. हे मला आठवत नाही की, पंचनाम्यामध्ये वाहनाचे कुठल्या पार्टसचे नुकसान झाले होते या बाबी नमूद केल्या होत्या किंवा नाही. हे म्हणणे खरे आहे की, वाहनाचे कोठे नुकसान झाले आहे या बाबी पंचनाम्यामध्ये नमूद करणे आवश्यक आहे. पोलीसांनी माझ्यासमक्ष वाहनाचे कुठल्यसा पार्टसचे नुकसान झाले आहे अथवा वाहनाचा कुठल्या भागाचा रंग गेलेला आहे याबाबत पाहणी केली होती. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्यामध्ये कुठल्याही वस्तुस्थितीदर्शक पाहणी करुन वाहना संदर्भाने कुठलाही मजकूर नमूद केलेला नाही.

०४.  हे म्हणणे खरे नाही की, अपघातस्थळी वळणाचा रस्ता आहे. पोलीसांनी रस्त्याची रुंदी टेपच्या सहाय्याने मोजली होती. हे मला सांगता येणार नाही की, सदरची मोजमापे कोण घेतली होती. हे मला लक्षात नाही की, रस्त्याची रुंदी किती होती. पोलीसांनी रस्त्याची रुंदी पंचनाम्यात लिहिली आहे का याबाबत मी खात्री केली होती. मी एकाच पंचनाम्यावर सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, रस्त्याची रुंदी पंचनाम्यामध्ये नमूद नाही. हे मला सांगता येणार नाही की, घटनास्थळावरती एकूण लाईटचे किती पोल आहेत. लाईटच्या पोलचा उल्लेख पंचनाम्यामध्ये केला होता. हे मला सांगता येणार नाही की, लाईटच्या पोलवरती कुठले नंबर लिहिलेले होते. पंचनाम्यामध्ये रस्ता हा बुधवळयाकडून चिंदरकडे जातो असे नमूद केले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचनाम्याला जागेवरती गेलो नव्हतो. हे मला लक्षात नाही की, पंचनामा किती वाजता सुरु झाला होता व किती वाजता पुर्ण झाला होता या बाबी पंचनाम्यात लिहिल्या होत्या किंवा नाही. पंचनामा हा साधारणपणे दिड तास सुरु होता. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळी गेलो नाही. हे म्हणणे खरे  नाही की, पोलीसांशी संबंध चांगले असल्यामुळे मी पंचनाम्यावर सही केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्यावर सही असल्यामुळे फिर्यादीच्या सांगण्यावरुन आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

ठिकाण : मालवण
दिनांक :  ०३/०३/२०२५

महेश रा. देवकते
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मालवण.